आक्टोबर २००४

# असे करता येणार नाही

राज्याचे सहकार आयुक्त श्री उमेशचंद्र सारंगी व अतिरीक्त सहकार आयुक्त श्री यशोद यांनी राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, उप /सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे माध्यामातुन नागरी/ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या बाबतीत भितीदायक वातावरण तयार करण्याची प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष वातावरण निमिर्ती केल्याचे अनेक तक्रारी ऐकावयास मिळत आहेत. महाराष्ट्र राज्यात १४००० च्यावर पतसंस्था नोंदणीकृत असून रुपये एक कोटीच्या आत खेळते भांडवल असणाऱ्यांची संख्या ९३ टक्के पेक्षा जास्त आहे. अशा पतसंस्थाना व रुपये एक कोटी पेक्षा जास्त खेळते भांडवल असणाऱ्या ७ टक्के पतसंस्थांना वेगवेगळ्या माध्यमातुन त्रस्त करण्याचे काम व पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना घाबरुन जाण्याचे काम नाही, व संबंधीत सहकार खात्यातील अधिकाऱ्यांना असे करता येणार नाही.

आदर्श उपविधी स्विकारण्याच्या कामी राज्यामध्ये उच्छांद मांडला होता. आणि हा आदर्श उपविधी जर पतसंस्थांनी स्विकारला नाही तर त्यांच्येवर कारवाई केली जाईल, तसेच ज्यांना जमेल त्या ठिकाणी अडविले जाईल अशी भुमिका सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांनी स्विकारली होती.एवढेच नव्हे तर अमूक एका ठिकाणावरुनच उपविधी प्रती खरेदी करून इतरत्र ठिकाणी खरेदी करून प्रस्ताव स्विकारण्याच्या प्रकारणाला मंजुरी देता येणार नाही, असे वातावरण बेकायदेशीरपणे उभे केले होते. परंतु मुंबईसह राज्यातील कार्यकर्त्यांनी याप्रकरणी सद्विवेवक बुध्दीने अभ्यासपूर्वक या गोष्टींचा मुकाबला केला व सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांचे सगळे हल्ले परतिवले.आणि खात्याच्या अधिकाऱ्यांना असे करता येणार नाही हे सिध्द करुन दाखविले. त्याबद्दल या सर्वांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

प्रत्येक महिन्यास एम.आय. एस.पध्दत पतसंस्थांसाठी चालू केली. दोन तीन महिने हे नाटक चालू राहिले.आणि तद्नंतर आदेश काढणारेच याकामी निष्क्रीय झाले. कारण पतसंस्थांना मदत करण्याची भूमीका स्वकारणे त्यांना परवडत नाही. पतसंस्थां केव्हा व कशी अडचणीत आणता येईल व त्या माध्यामतुन पतसंस्थेचे चौकशी करणे, कलम ७८,८३,८८खाली कार्यकर्त्यांना व पतसंस्थांना कसे अडचणीत आणता येईल की, ज्याचे माध्यमातून दिलेली नोटीस परत घेण्यासाठी करोडो रुपये जमा करता येईल.आणि ही जुलूमशाही व उन्मतपणा व खुलेआम भ्रष्टाचाराच्या विरोधात कार्यकर्त्यांनी स्वबळावर शिक्षण-प्रशिक्षणाचा अंगिकार करुन निर्भीडपणे मुकाबला केला व खात्याच्या अधिकाऱ्यांना असे करता येणार नाही हे ठणकावून सांगितले.

पतसंस्थेच्या कार्यालयाचा पत्ता बद्दल, उपविधी दुरुस्ती प्रकरण, लेखा परिक्षण, दोष दुरुस्ती अहवाल, कलम १०१ खाली थकबाकी वसुल करण्याचाी प्रकरणे या नावाखाली अधिकाऱ्यांवर या चळवळीतील कायकर्त्यांनी निर्भीडपणे अंकुश ठेवून भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या विरोधात दंड थोपटले. प्रसंगी कार्यकर्ते या प्रवृत्तीच्या विरोधात व जे दलाल पुणे येथील मुख्यालयात तसेच विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक उप / सहाय्यक निबंधक कार्यालयात मध्यस्थ म्हणून भूमिका बजावण्याचे काम करतात, व पैसे उकळतात. त्यांना जागी थांबविण्याचे काम धाडसाने होऊ लागलेले आहे. ही बाब या चळवळीच्या दृष्टीने अत्यंत अशादायक आहे.

नवीन पतसंस्था नोंदणीचे निकष धनिक लोकांना परवडतील असे केल्यामुळे पुर्वीच्या नोंदणी झालेल्या छोट्या संस्था व त्यामध्ये काम करणारे कार्यकर्ते यांना या पतसंस्था व्याजाचे खाजगी धंदे करणाऱ्यांना व एक संस्था दुसऱ्याच्या हातात देण्यासाठी पैशाच्या जोरावर जे काम चालू केले होते, यालासुध्दा कार्यकर्त्यांनी अत्यंत लढावू बाण्याने परतिवले आहे.पतसंस्था एक लाख रुपये किंवा त्याहून कमी खेळत्या भांडवलाची असली तरी तुम्ही या पतसंस्था सक्षमपणे कायद्याच्या चौकटीत राहून चालवू शकता. त्या पतसंस्था सहकार खात्याला गुंडाळता येणार नाही. किंबहूना हे काम त्यांना करता येणार नाही, हे या निमित्ताने सांगू इच्छितो.

पतसंस्थेचा उपविधी पारायणासारखा किंवा हरिपाठासारखा किंवा वर्तमापत्रासारखा वाचा, समजून घ्या, आत्मसात करा व त्याची जशीच्या तशी अंमलबजावणी करा. सहकार खात्याला तुमचे काहीही करता येणार नाही. यावर आता दिवसेदिंवस कार्यकर्त्यांच्या विश्वास वाढत चालेला आहे. सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासन रोज आठ तास काम करण्याचा पगार देते. याच्या व्यतिरिक्त त्यांना आणखी माया जमविण्यासाठी जे उलटे पालटे काम करण्यासाठी त्यांची जी प्रवुत्ती झाली आहे, ती दुर करण्यासाठी पतसंस्थांमधल्या कार्यकर्त्यांना शिक्षण-प्रशिक्षण देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, विभागीय मंडळे व जिल्हा बोर्ड करण्यास सक्षम व समर्थ आहेत. आता खात्याच्या अधिकाऱ्यांनी पतसंस्थांना अडचणीत न आणता. नोटीसा न काढता,कारवाईची धमकी न देता, मदत केली जावू शकते याचे शिक्षण आणि प्रशिक्षण देण्याचे दायीत्व ''**पतसंस्था परिवाराच्या**'' माध्यमातुन आम्ही स्विकारलेली आहे. मुंबईसह राज्यातील अनेक खात्यातील अधिकारी व कर्मचारी या कामासाठी व आमच्या वैचारीक भुमिकेशी १०० टक्के सहमत असून ते निश्चितपणे अभिनंदनास पात्र आहेत.

वॉर्ड / तालुका स्तरावर सबंधित उपसहाय्यक निबंधक यांनी, ज्या पतसंस्थांची थकबाकी झालेली आहे, निधी नियोजन करणे कामी त्यांचे प्रयत्न अपुरे पडतात, व इतर अनुषंगिक कामासाठी पतसंस्थांच्या कार्यालयात महिन्यातून किमान एकदा मित्र म्हणून चांगल्या भावनेने गेले पाहिजे. संचालक व कर्मचारी यांचेशी पतसंस्थेचा कारभार वाढविणेसाठी व अडचणीतुन मार्ग काढणेसाठी प्रत्यक्ष मदत करावयास पाहिजे. अशी भुमिका या राज्यात एक दिवस सहकार कायद्यामध्ये दुरुस्ती करावयास शासनाला भाग पाडू या बद्दल प्रचंड आत्मविश्वास आहे.

एकदा खात्यातील अधिकाऱ्यांनी ठरविले की, शासनाकडून मिळणाऱ्या पगाराव्यतिरीक्त एकही नवा पैसा संस्थांकडून घ्यायचा नाही. किंबहूना तशी परिस्थिती करायची नाही. तेव्हा हा भ्रष्टाचार जागेवरच थांबेल. आमचेकडे खात्यातील अनेक अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची माहिती प्राप्त झालेली आहे. पत्नी, मुले, जावई, मेव्हणे व इतर नातेवाईकांच्या नावे स्थावर-अस्थावर मालमत्तेची तपासणी राज्य सरकार एक दिवस निश्चित करेल, अशी परिस्थिती या चळवळीतील कार्यकर्ते करतील असे दिवसेंदिवस वातावरण होत चालल्याबद्दल आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना या चळवळीत प्रचंड उमेद वाटते. व ही उमेद राज्याला संपन्न बनिविण्याच्या योगदानात हातभार लावेल असे वाटते.

जे काम कायद्याचे आहे परंतु सहकार खात्याचे नाही, ते काम राज्याच्या सहकार आयुक्तांना सुध्दा करता येणार नाही, हे पुन्हा आम्ही जाहीरपणे सांगत आहोत.

सहकार कायद्याच्या माध्यामातुन प्राप्त अधिकाराचा गैरअर्थ काढून आतापर्यंत काढलेली परिपत्रके व आदेश हे ज्या–ज्यावेळी मर्यादा सोडून व बेकायदेशिरपणे काढलेली आहेत, त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पतसंस्थांची नाही. **''राज्याचे सहकार आयुक्त अमुक सहकारी संस्थेमध्ये ठेव ठेवा किंवा त्या सहकारी संस्थेचे भाग खरेदी करा''** असे परिपत्रक काढू शकत नाही. व त्याचे अधारे जी रक्कम राज्यात जमा केलेली आहे, त्याचा जाब राज्याच्या सहकार आयुक्तांना भविष्यकाळात द्यावा लागेल. किंबहूना ते आम्ही करणार, हे पुन्हा एकदा या चळवळीतल्या कायकर्त्यांच्या माहितीसाठी आठवण करुन देत आहोत.

**''एका संस्थेस एक न्याय व दुसऱ्या संस्थेस दुसरा न्याय''** याची तपासणी सर्व स्तरावर करुन घेण्यासाठी आम्ही शेवटपर्यंत पाठ पुरावा करीत आहोत. आणि निश्चितपणे आपल्या सर्वांच्या सहकार्याने व प्रत्यक्ष कृतीशील भावनेने यात यश येणार यात शंका नाही.आणि मग येथून पुढे कुठलाही सहकार आयुक्त किंवा त्यांचे निमस्तरीय अधिकारी अशाप्रकारे धाडस या राज्यात करणार नाहीत. किंबहुना कै.धनजय गाडगीळ, कै.वैकुंठभाई मेहता, कै.वसंतदादा पाटील यांना अभिप्रेत असलेली ही सहकार चळवळ सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांना चिरडता येणार नाही, किंबहूना असे काम त्यांना करता येणार नाही.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**